ज्ञान शांति मैत्री

आज़ादी का अमृत महोत्सव

# महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय

**Mahatma Gandhi Antarrashtriya Hindi Vishwavidyalaya**

(संसद द्वारा पारित अधिनियम 1997, क्रमांक 3 के अंतर्गत स्थापित केन्द्रीय विश्वविद्यालय)

*(A Central University Established by Parliament by Act No. 3 of 1997)*

**कादर नवाज़ खान**
**Kadar Nawaz Khan**
कुलसचिव
Registrar

दूरभाष / Phone : +91-7152-251661
मोबाइल / Mobile : +91-9422905760

क्रमांक : 34/2021-22/वाहन प्रवेश पास/346
दिनांक : 10.07.2023

## परिपत्र

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वर्धा द्वारा अवगत कराया गया है कि Motor Vehicle Act 1988 के नियम 128 के अनुसार दो पहिया मोटर साइकिल चालक और उनके साथ के सवार को बिना हेलमेट के दुपहिया मोटर वाहन न चलाने एवं Motor Vehicle Act 1988 के नियम 129 के अनुसार मोटर साइकिल वाहन चलाते समय चालक व पीछे बैठने वाले को हेलमेट का उपयोग करना अनिवार्य किया गया है।

Motor Vehicle Act 1988 के नियम 194 (C) के अनुसार मोटर साइकिल चलाते समय बिना हेलमेट चालक व पीछे बैठने वाला व्यक्ति दिखने पर उनको रू. 1000/- (रूपया एक हजार मात्र) का जुर्माना और 03 माह के लिए लाइसेंस निलंबित किया जा सकता है।

आप सभी विद्यार्थियों/अध्यापकों/अधिकारियों/कर्मचारियों से निवेदन है कि उक्त को दृष्टिगत करते हुए विश्वविद्यालय परिसर में दो पहिया वाहन चलाते समय हेलमेट का उपयोग सुनिश्चित करें।

यह सक्षम प्राधिकारी के अनुमोदनोपरांत जारी किया जाता है।

कादर नवाज़
**(कुलसचिव)**
10/07/23

**संलग्नक–परिवहन आयुक्त, महाराष्ट्र शासन द्वारा जारी परिपत्र**

**प्रतिलिपिः**

1. माननीय कुलपति महोदय की ओर सूचनार्थ ।
2. वित्ताधिकारी
3. समस्त अध्यापक/अधिकारी/कर्मचारी
4. समस्त छात्रावास अधीक्षक
5. लीला प्रभारी (विश्वविद्यालय की बेवसाइट पर अपलोड करने हेतु)
6. सुरक्षा अधिकारी (आवश्यक कार्यवाही हेतु)
7. कुलसचिव कार्यालय
8. संबंधित फाइल

10/7/23

**दुचाकीस्वार चालकांची रस्त्यावरील सुरक्षितता वाढविण्यासाठी मोटार वाहन कायद्यातील तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**

५वा मजला, फाऊंटन दूरसंचार भवन-२,

महात्मा गांधी मार्ग, फोर्ट,

मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६१४७२६ Email ID - roadsafety.maharashtra@gmail.com

पआका/रस्ता सुरक्षा कक्ष/दुचाकीस्वार चालकांबाबत/२०२३/जा.क्र. 7123 दिनांक- 16 JUN 2023

**परिपत्रक क्र. /२०२३**

भारतामध्ये दरवर्षी जवळपास १.५० लाख व्यक्ती तर महाराष्ट्रात सुमारे १५००० व्यक्ती रस्ते अपघातांमध्ये आपला जीव गमावतात. रस्ते अपघात ही एक गंभीर समस्या आहे. कित्येक लोकांना अपघातांमुळे कायमचे अपंगत्व येते. या अपघातांमध्ये संख्यात्मक दृष्टीने विचार केल्यास जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत झालेल्या एकूण अपघातांपैकी ५१% पेक्षा अधिक अपघात दुचाकी चालकांचे झालेले आहेत, त्यामध्ये ७७०० लोक मृत्यूमुखी पडले आहेत. दुचाकी वाहनांच्या अपघातांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की, अधिकतर दुचाकी चालकांचे अपघातातील मृत्यू हे वाहन चालवितांना हेल्मेट न घातल्यामुळे व डोक्याला इजा झाल्यामुळे होतात. ही बाब रस्ता सुरक्षेच्या दृष्टीकोनातून अतिशय चिंताजनक आहे.

रस्ते सुरक्षेच्या दृष्टीकोनातून विविध कायदेशीर तसेच इतर आवश्यक उपाययोजना राबवून २०३० पर्यंत अपघातांमध्ये ५०% घट करण्याचे उद्दिष्ट जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांनी दिले आहे. त्यास अनुसरून अपघातांमध्ये लक्षणीय घट करण्याचा उद्देश साध्य करण्याचा परिवहन विभागाचा मानस आहे. परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत वेळोवेळी याबाबत मार्गदर्शक सुचना तसेच परिपत्रक निर्गमित होत असतात. परंतु या सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येते.

या पार्श्वभूमीवर दुचाकी वाहन चालकांच्या अपघातांचे तसेच अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने संपुर्ण राज्यात दुचाकी चालकांचे रस्ता सुरक्षा व कायदेशीर तरतुदींबाबत समुपदेशन होणे अत्यंत गरजेचे आहे. याकरीता आपणास सुचित करण्यात येत आहे की, दुचाकी वाहन चालकांसाठी मोटार वाहन कायद्यात ज्या तरतुदी आहेत, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी संपुर्ण राज्यात प्राधान्याने समुपदेशन उपक्रम सुरु करून पुढीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात याव्यात.

Scanned with OKEN Scanne

**१. लायसन्स नसलेल्या व अल्पवयीन मुलांना दुचाकी चालविण्यापासून प्रतिबंध करणे व पालकांचे समुपदेशन करणे. (मोटार वाहन कायदा १९८८, कलम ३, ४)**

मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ४ अंतर्गत - १. अठरा वर्षाखालील कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी मोटार वाहन चालवु नये. परंतु ५० CC पेक्षा जास्त नसलेली इंजिन क्षमता असलेली मोटार सायकल वयाच्या सोळाव्या वर्षानंतर कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी चालविता येईल.

२. कलम १८ च्या तरतुदींच्या अधीन राहून, वीस वर्षांपेक्षा कमी वयाच्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वाहतुक वाहन चालवु नये.

**(मोटार वाहन कायदा १९८८, कलम (१८०/१८१/१९९ अ )**

अशा परिस्थितीत लायसन्स नसलेल्या अल्पवयीन मुलांना दुचाकी चालविण्यापासून प्रतिबंध करावे. तसेच त्यांच्या पालकांचे समुपदेशन करावे तरीही नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर मोटार वाहन कायदा १९८८ - कलम १८०, १८१, १९९(अ) अंतर्गत दंडात्मक कारवाई करावी.

**(मोटार वाहन कायदा १९८८, कलम १९९ अ)**

१८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या मुलांना (Juveniles) मोटार सायकल/ अथवा इतर वाहन चालविण्याची पालकांनी परवानगी दिल्यास मोटार वाहन कायदा १९८८ - कलम १९९(अ) अंतर्गत रु.२५,०००/- दंडाच्या शिक्षेची तरतूद असून अशा मुलांना वयाच्या २५ वर्षापर्यंत लायसन्स देण्यापासून प्रतिबंध करण्यात आलेले आहे याबाबत पालकांचे लक्ष वेधावे व समुपदेशन करावे.

**२. मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ११२ अंतर्गत वेगमर्यादेचे पालन करणे :-**

कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, वाहनासाठी या अधिनियमाद्वारे किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमाद्वारे किंवा अन्वये निश्चित करण्यात आली असेल, अशा कमाल वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगाने एखादी मोटारसायकल चालविता कामा नये किंवा मोटारसायकल वाहन चालविण्यास भाग पाडू नये किंवा अनुमती देता कामा नये.

**मोटार वाहन कायदा १९८८, कलम १८४ धोकादायक पद्धतीने वाहन चालविणे** - वेगमर्यादेचे उल्लंघन करुन धोकादायकपणे वाहन चालवु नये यासाठी दुचाकीस्वार यांचे समुपदेशन करावे. तरीही नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर मोटार वाहन कायदा १९८८ - कलम १८४ अंतर्गत दंडात्मक कारवाई करावी.

**३. मोटार सायकल वाहनांवर सुरक्षेकरीता आवश्यक उपकरणांची अंमलबजावणी करणेबाबत.**

**केंद्रिय मोटार वाहन नियम १९८९, कलम १२३**:- केंद्रिय मोटार वाहन कायदा १९८९ मधील कलम १२३ च्या नियमानुसार सर्व प्रकारच्या दुचाकी वाहनांवर मोटार सायकलच्या निर्मात्यांनी त्यांचे निर्मितीदरम्यान मोटार सायकलच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपकरणे बसविणे बंधनकारक आहे.

Scanned with OKEN Scanne

सर्व दुचाकी वाहनांवर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असणारी उपकरणे उदा. पाठीमागील चाकावर जाळी, पाठीमागील व्यक्तींसाठी हॅन्ड रेस्ट, पाय ठेवण्यासाठी दोन्ही बाजूला फुटरेस्ट असणे बंधनकारक आहे.

रस्त्यावरील सर्व दुचाकी वाहनांची तपासणी करुन दुचाकीस्वार यांचे याबाबत समुपदेशन करावे. तसेच अंमलबजावणी करण्यात यावी.

**४. दुचाकीवर मोटारसायकलस्वार स्वत: व्यतिरिक्त एकापेक्षा अधिक व्यक्ती घेऊन जाणार नाही या कायदेशीर तरतुदीची अंमलबजावणी करणेबाबत.**

**मोटार वाहन कायदा १९८८, कलम १२८** - मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम १२८ नुसार प्रत्येक मोटारसायकलस्वार स्वत: व्यतिरिक्त एकापेक्षा अधिक व्यक्तींना घेऊन जाऊ शकत नाही.

**मोटार वाहन कायदा १९८८, कलम १९४ C** - कलम १९४ C नुसार जो व्यक्ती कलम १२८ किंवा त्याखाली बनवलेल्या नियमांचे उल्लंघन करुन दुचाकी चालवतो किंवा परवानगी देतो, तो रु. १००० च्या दंडास पात्र ठरतो आणि तीन महिन्याच्या कालावधीसाठी लायसन्स धारण करण्यासाठी अपात्र ठरेल.

याबाबत दुचाकीस्वार यांचे समुपदेशन करावे. तरीही नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर मोटार वाहन कायदा १९८८ - कलम १९४ C अंतर्गत दंडात्मक कारवाई करावी.

**५. वाहन उत्पादकामार्फत वाहन खरेदीच्या वेळी खरेदीदारास दोन हेल्मेटचा पुरवठा करण्याच्या कायदेशीर तरतुदीची अंमलबजावणी करणेबाबत.**

**मोटार वाहन कायदा १९८८, कलम १३८:-** उपरोक्त कलम १३८ (४) (f) अन्वये वितरकाने नविन दुचाकी वाहन विकल्यानंतर खरेदीदारास BIS मान्यतेचे दोन हेल्मेट देणे बंधनकारक आहे. आपल्या अधिनस्त असलेल्या प्रत्येक दुचाकी विक्रेत्याने या नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. जे वितरक या नियमाचे पालन करत नसतील त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

**६. हेल्मेट वापरासाठी दुचाकीचालक/दुचाकीस्वार/वाहनमालक व कारणीभूत असलेल्या व्यक्तींचे/संस्थांचे समुपदेशन व दंडात्मक कारवाई करणेबाबत.**

मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम १९४ड मधील तरतुदीनूसार हेल्मेट वापरासंबंधी तरतुदींचा भंग करणाऱ्या अथवा त्यास संमती देणाऱ्या व्यक्तीस दंडाची तरतुद आहे ती पुढीलप्रमाणे..

**मोटार वाहन कायदा १९८८, कलम १२९:-** प्रत्येक व्यक्तीने (४ वर्षावरील), वाहन चालवितांना किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्णनाच्या मोटारसायकलवरुन जात असताना, सार्वजनिक ठिकाणी केंद्र सरकारने विहीत केलेल्या मानकांनुसार हेल्मेट घालणे बंधनकारक आहे.

**मोटार वाहन कायदा १९८८, कलम १९४ D** :- उपरोक्त कलम १९४(ड) अन्वये विनाहेल्मेट दुचाकी चालविणे किंवा चालविण्यास संमती देणे अशा दोघांवरही जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असून त्यांना दंडात्मक कारवाईची तरतुद आहे.

Scanned with OKEN Scanne

ज्या व्यक्ती दुचाकी वाहन चालविण्याकरीता अनुज्ञप्ती घेण्यासाठी येतात, त्यावेळी त्यांची चाचणी घेण्यापुर्वी रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक समुपदेशन करुन जनजागृती करावी. तसेच सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी संस्था, कंपन्या येथील आस्थापनेवरील दुचाकी वापरणारे अधिकारी व कर्मचारी, सर्व कॉलेजमधील विद्यार्थी, सामान्य नागरिक जे दुचाकी वापरतात त्यांना हेल्मेट वापरणे कायद्याने बंधनकारक असल्याबाबत जनजागृती करावी. तर तसे न केल्यास कायद्यातील तरतुदीनूसार त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल याची सुद्धा जाणीव करुन द्यावी. याबाबत सर्व शाळा, महाविद्यालये, संस्था, खाजगी कंपन्या, शासकीय-निमशासकीय कार्यालये यांना लेखी पत्र पाठवून कायद्यातील तरतूदींची आगावू जाणीव करुन द्यावी. तसेच कायदेशीर तरतुदीबाबत कळविण्यात यावे व अंमलबजावणीकरीता त्यांचे सहकार्य घ्यावे. त्यानंतरच दंडात्मक कारवाईची अंमलबजावणी करण्यात यावी.

**सदर परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी करुन प्रत्येक महिन्यातील केलेल्या कार्यवाहीचा अहवाल रस्ता सुरक्षा कक्षाकडे सादर करावा.**

**(विवेक भीमनवार)(भा.प्र.से.)**
**परिवहन आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रति,**

सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी वरील परिपत्रकानुसार आवश्यक कार्यवाही करुन त्याबाबत प्रभावी अंमलबजावणी करावी.

**प्रत:-** मा. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

Scanned with OKEN Scanne